दिनांक.०३/११/२०१८

## प्रेसनोट

# मंगळसुत्र चोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार अटकेत

### भारती विद्यापिठ तपास पथकाकडून २४ तासाचे आत गुन्हा उघडकीस

दिनांक-२९/१०/२०१८ रोजी सांयकाळी ५.१५ वा सुमारास तक्रारदार महीलानामे सौ.धनश्री सुनिल गोसावी वय.४० वर्ष धंदा-गृहीणी रा. संन ३२/१ क अष्टविनायक कॉलनी जवळ स्वप्नपुर्ती बंगल्याशेजारी शेलारमळा कात्रज पुणे या राहते घराजवळ श्री रघुकुल बंगल्याचे गेटजवळ भितीलगत असलेले बेलाच्या झाडाची पाने तोडत असताना पांढरे रंगाचे मोपेड मोटार सायकलवरुन आलेले दोन अनोळखी इसमाने त्यांचे गळयातील सोन्याचे मिनी गंठण जबरदस्तीने हिसका मारुन घेवुन चोरी करुन पांढरे रंगाचे मोपेड मोटार सायकलवरुन कात्रज तलावाचे दिशेने पळुन गेलेले आहेत त्याबाबत भारती विद्यापिठ पो.ठाणेस गुन्हा दाखल झाला होता.सदर वेळी भारती विद्यापिठ तपास पथकातील कर्मचारी यांनी घटनास्थळाचे परिसरातील एकुण ४१ सी.सी.टी.व्ही कॅमेरे पाहून व गुन्हयामधे वापरलेल्या ॲक्टीवा मोपेड सारखी १२६ वाहने चेक करून दाखल गुन्हयात वापरण्यात आलेली संशयित ॲक्टीवा मोपेड बाबत माहीती घेवून अधिक तपास केला असता सदरचे आरोपी हे रेकॉर्डवरील चैन स्नॅचर असलेबाबत माहीती काढली असता **पोलिस कर्मचारी विनोद भंडलकर व प्रणव संकपाळ** यांना बातमीदाराकडून माहीती मिळाली की,सदरचा गुन्हा इसमनामे १**).किशोर शंकर मोरे वय.३२ वर्ष रा. गल्ली नं २ कॅनॉललगत डायसप्लॉट गुलटेकडी पुणे** २).**आकाश गोविंद गायकवाड वय.२५ वर्ष रा. साईबाबा मंदीरासमोर पर्वती दर्शन पुणे** यांनी केला आहे.अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्याचा शोध घेवून त्यांना पोलीस ठाणे येथे आणुन त्यांना विश्वासात घेवुन तपास केला असता तपासादरम्यान त्यांनी दाखल गुन्हा केल्याची कबुली दिलेनंतर त्यांस दाखल गुन्हयात अटक करून त्यांची पोलीस कस्टडीचे तपासादरम्यान त्याचेकडून २० ग्रॅम सोन्याचे मिनी गंठण व गुन्हयामध्ये वापरलेली पांढरे रंगाची ॲक्टीव्हा मोपेड असा एकुण कि.रू.१,०५,०००/- चा माल जप्त करण्यात आला आहे.

**वरील दोन्ही आरोपीवर दत्तवाडी,सहकारनगर,भारती विद्यापिठ या पोलीस ठाणेस एकुण १५ चैन स्नॅचिंगचे गुन्हे दाखल असून** आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील एक गुन्हा उघडकीस आला आहे.त्याचा अधिक तपास चालु असून अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम विभाग, मा.श्री बच्चन सिंह सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.रविंद्र रसाळ सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक शिवदास गायकवाड,सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव, पोलीस हवालदार विनोद भंडलकर,गणेश सुतार,प्रणव संकपाळ,उज्वल मोकाशी, शिवदत्त गायकवाड,जगदीश खेडेकर यांचे पथकाने केलेली आहे.**

Scanned by CamScanner